# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक १६४ वा शनिवार दि.२५ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# मांजरा परीवारातील परंपरेला साजेसा ऊच्चांकी ऊसदर देण्याचा ट्वेन्टीवन शुगर्सचा निर्धार

## २ हजार ५०० रू. चा पहीला हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा

ऊसाला जास्तीचा दर देण्याची मांजरा परीवाराची परंपरा टवेन्टिवन शुगर्सही कायम राखणार मांजरा परीवारातील सर्वच साखर कारखान्यानी आजवर अधिकात अधिक गाळप क्षमतेचा वापर करून कमीत कमी खर्चात अधिक साखर व उपपदार्थांची निर्मीती केली आहे. परिणामी शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाला अधिकचा भाव मिळाला आहे.टवेन्टिवन शुगर्स कारखानाही मांजरा परीवारातील मांजरा, रेणा, विलास,जागृती या कारखान्याची परंपरा पूढे चालवत आहे. अदययावत यंत्रणेव्दारे उभारण्यात आलेल्या टवेन्टिवन शुगर्सने कार्यक्षमतेचा वापर, ऊसाचे गाळप या बाबतीत ऊच्चांकी कामगिरी केली असून परीवारातील साखर कारखान्याप्रमाणेच शेतकऱ्यांना ऊसदर देऊन त्यांच्या जीवनात आर्थिक परीवर्तन घडवण्याचा निर्धार केला असल्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सांगीतले आहे.



लातूर/ प्रतिनिधी :- टवेन्टिवन शुगर्स लि. कारखान्याकडून विकासरत्न विलासराव देशमुखमांजरा परीवारातील मांजरा, विलास, रेणा, जागृती या कारखान्याच्या परंपरेला साजेसा ऊच्चांकी अंतीम ऊसदर देण्याचा निर्धार करण्यात आला आहे,अशी माहीती राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिली आहे.या अनुषंगाने मांजरा परीवारातील साखर कारखान्या प्रमाणे लातूरातील टवेन्टिवन शुगर्स लि. कारखान्याकडून चालू गळीत हंगाम २०२३-२०२४ साठी गाळप झालेल्या ऊसाला ऊसदरा पोटी प्रतिटन २ हजार ५०० रूपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले आहेत. मांजरा परीवारातील साखर कारखाने कारखानदारीत अग्रगण्य आहेत. या साखर उदयोगाच्या समूहात आज मराठवाडा, विदर्भात अत्याधुनीक साखर कारखाना म्हणून टवेन्टिवन शुगर्स अल्पावधीत राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली नावारूपाला आला आहे.ऊसउत्पादकांसाठी टवेन्टिवन शुगर्स ठरला आधार लातूर जिल्हासह परीसरातील तालुक्यातील ऊसउत्पादकांच्या ऊसाचे वेळेवर गाळप करणारा हक्काचा कारखाना त्यांना हवा होता. या सर्व ऊसउत्पादाकांच्या ऊसाचे वेळेवर गाळप करण्यासाठी टवेन्टिवन शुगर्स कारखाना महत्वाचा ठरला आहे. मागील वर्षी अतिरीक्त ऊसाचे ऊत्पादन झाले होते. ऊसउतपादकांचा ऊस गाळपावीना शिल्लक राहील असा प्रश्न निर्माण झाला होता. या काळात टवेन्टिवन शुगर्स,ने दिर्घकाळ गाळप हंगाम चालवून १२ लाखा मे. टन पेक्षा अधीकचे विक्रमी गाळप केले. या परीसरातील शेतकऱ्यांना या कठीण काळात न्याय देण्याचे काम या काळात कारखान्याने केले. यामुळे परीसरातील सभासद व बिगर ऊसउत्पादक शेतकऱ्यांसाठी हा कारखाना आधार ठरला आहे. या कारखान्यामुळे लातूर जिल्हा व परीसरातील ऊसउत्पादक शेतकऱ्यांना एकप्रकारे कायमस्वरूपी आधार मिळाला आहे.टवेन्टिवन शुगर्स हंगामातील १ लाख मे. टन ऊस गाळपाच्या ऊबरठयावर या गळीत हंगामात सुध्दा ऊसतोडणी यंत्रणेचा प्रभावी वापर करून कारखाना दैनदीन गाळप वेगाने करीत आहे. या गळीत हंगाम टवेन्टिवन शुगर्स हंगामात ऊसाच्या १ लाख मे.टन गाळप ऊंबरठयावर आहे.गळीत हंगामात गाळप झालेल्या ऊसाला पहीला हप्ता २ हजार ५०० रूपये प्रति टन प्रमाणे देण्यात येणार असून आज पर्यंत गळीत झालेल्या ऊसाला प्रति टन प्रमाणे रू. २ हजार ५०० रूपये ऊसदरापोटी अदा करण्यात येत आहेत. ऊस बीलाची ही रक्कम टवेन्टिवन शुगर्स ली. कडून संबंधीत ऊसउत्पादकांच्या बॅंक खात्यावर जमा करण्यात आली आहे.अवघ्या तीन गळीत हंगामातच विक्रमी कामगीरी माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रियमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्याप्रेरणेने, सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या नियोजनाने व माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली टवेन्टिवन शुगर्सची ऊभारणी झाली आहे. अवघ्या तीन हंगामातच या कारखान्याची कामगीरी विक्रमी ठरली आहे. पहील्या हंगामापासूनच ऊसाचे विक्रमी सर्वाधीक गाळप केले, दर्जेदार साखरेचे ऊत्पादन केले, तांत्रीक कार्यक्षमतेचा चांगला वापर केला आहे. यामुळे तीन हंगामातील कामगीरीवरच कारखाना साखर उदयोगात अत्याधुनीक आणि अग्रगण्य कारखाना ठरला आहे.

# उदगीर आणि जळकोट तालुक्यातील रस्ते विकासाला गती - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

लातूर : - शेतमाल वाहतूक आणि दळणवण सुविधा बळकटीकरणासाठी उदगीर आणि जळकोट तालुक्यातील रस्त्यांच्या कामाला गती देण्यात आली आहे. आतापर्यंत विविध योजनांमधून रस्ते कामांसाठी भरीव निधी मंजूर करण्यात आला आहे. हे सर्व रस्ते दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी केल्या. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून उदगीर आणि जळकोट तालुक्यातील सहा रस्ते विकास कामांच्या भूमिपूजनप्रसंगी ना. बनसोडे बोलत होते. उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना विभागाचे कार्यकारी अभियंता आसिफ खैराडी, गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, उदगीरचे माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सिध्देश्वर पाटील, सदस्य श्याम डावळे, बाळासाहेब मरलापल्ले, सर्जेराव भांगे यांच्यासह विविध गावांचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते. रस्ते हे विकास वाहिनी म्हणून काम करतात. त्यामुळे उदगीर आणि जळकोट तालुक्यात इतर मूलभूत पायाभूत सुविधा निर्मितीसोबतच रस्ते विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. पालकमंत्री पांदण रस्ता योजना, मातोश्री ग्रामसमृद्धी शेतरस्ता पाणंद योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, जिल्हा वार्षिक योजनेतून रस्ते विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उदगीर, जळकोट तालुक्यासाठी मंजूर केला आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून आणखी २५ किलोमीटर लांबीच्या कामांना मंजुरी मिळाली आहे, तसेच २५ किलोमीटर लांबीच्या कामांचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. या योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातही उदगीर आणि जळकोट तालुक्याला जास्तीत जास्त निधी मंजूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून उदगीर तालुक्यातील ४ आणि जळकोट तालुक्यातील २ कामांचे भूमिपूजन पांदण व शेतरस्त्यांची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना

तसेच पालकमंत्री पांदण रस्ता आणि मातोश्री ग्राम समृद्धी शेतरस्ते पांदण योजनेतील कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. उदगीर आणि जळकोट तालुक्यातील सर्व समाज घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी सिंचन, वीज, आरोग्य विषयक कामांना भरीव निधी मंजूर करण्यात आला आहे. ही सर्व कामे गतीने आणि दर्जेदार होण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. जळकोट तालुक्यातील तिरू बॅरेजचे काम पूर्णत्वास आले असून लवकरच त्याचे लोकार्पण होईल. त्याचप्रमाणे दोन्ही तालुक्यातील प्रशासकीय इमारत, विविध समाजासाठी भवन उभारणे, पायाभूत सुविधा बळकटीकरणाला गती देण्यात आली असल्याचे ना. बनसोडे म्हणाले.






उदगीर आणि जळकोट तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशनची अंमबजावणी प्रभावीपणे करण्यात येत आहे. तसेच या दोन्ही तालुक्यातील १९२ गावांसाठी ६०० कोटी रुपयांची वॉटर ग्रीड योजना मंजूर करण्यात आली असून या योजनेचे काम गतीने सुरू आहे. त्यामुळे या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे, असे ना. बनसोडे म्हणाले. तसेच विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी ५ विद्युत उपकेंद्रे मंजूर केली असून त्यापैकी २ उपकेंद्रे पूर्ण झाली आहेत. तसेच ३ उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे, असे ते म्हणाले. याप्रसंगी उपस्थित विविध गावांचे सरपंच, पदाधिकारी आणि नागरिकांनी रस्ते कामाला निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ना. बनसोडे यांचे आभार मानले. सर्व महसूल मंडळातील शेतकऱ्यांना पीक विमा अग्रिम मिळवून देणार प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून उदगीर आणि जळकोट तालुक्यातील काही महसूल मंडळांमध्ये विमा अग्रिम मंजूर करण्यास विमा कंपनी टाळाटाळ करीत आहे. मात्र सर्व महसूल मंडळातील शेतकऱ्यांना पीक विमा अग्रिम मिळवून देण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे ना. बनसोडे म्हणाले. तसेच राज्य शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती असलेल्या महसूल मंडळाच्या यादीत समाविष्ट नसलेल्या नागलगाव, मोघा आणि तोंडार या महसूल मंडळांचाही समावेश दुष्काळ सदृश्य परिस्थिती असलेल्या मंडळांच्या यादीत करण्याचा निर्णय लवकरच जाहीर होईल, असे त्यांनी सांगितले. उदगीर तालुक्यातील विविध ४ रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन

उदगीर तालुक्यातील राज्यमार्ग-२६८ ते डांगेवाडी रस्ता कामाचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. या रस्त्याच्या कामासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून २.६४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच राज्यमार्ग-२४९ (तोंडार पाटी) ते हंगरगा-क्षेत्रफळ या ६ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या कामासाठी सुमारे ५.७३ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. या कामाचे भूमिपूजनही ना. बनसोडे यांच्या हस्ते झाले. मोघा ते रावणगाव या रस्त्याच्या कामाचेही त्यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. या कामासाठी सुमारे ६.२५ लाख रुपयांचा निधी मंजूर आहे. यासोबतच राज्य मार्ग ६३ ते चवळे तांडा, मल्लापूर ते मल्लापूर तांडा या रस्त्याच्या सुमारे ३ कोटी ५ लाख रुपयांच्या कामाचे भूमिपूजनही ना. बनसोडे यांच्या हस्ते झाले. जळकोट तालुक्यातील २ रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन जळकोट तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग-५४ ते जिल्हा सरहद्द हिप्परगा रस्ता या सुमारे २.६२ कोटी रुपयांच्या कामाचे, तसेच तालुका सरहद्द शेलदरा - सोरगा-वडगाव-होकर्णा-वांजरवाडा ते राज्यमार्ग २५१ ते इतर जिल्हा मार्ग ५४ या सुमारे ३.८१ कोटी रुपयांच्या रस्ते कामांचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.

# राज्यस्तरीय आयपीएस पी. जी. परिषदेत डॉ. भाग्यश्री चव्हाण यांना प्रथम पुरस्कार

लातूर - इंडियन प्रोस्थोडॉन्टीक्स सोसायटी (खझड) च्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'पी. जी. परिषद २०२३' मध्ये लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील प्रोस्थोडॉन्टीक्स विभागातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाची विद्यार्थीनी डॉ. भाग्यश्री प्रविणसिंग चव्हाण यांच्या पोस्टर सादरीकरणास प्रथम पुरस्कार मिळाला आहे. या यशाबद्दल कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते डॉ. भाग्यश्री चव्हाण यांचे शाल व संत ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. पुणे येथील डी. वाय. पाटील दंत महाविद्यालयात नुकत्याच संपन्न झालेल्या राज्यस्तरीय 'आयपीएस पी. जी. परिषदेत प्रोस्थोडॉन्टीक्स विभागातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाची विद्यार्थीनी डॉ. भाग्यश्री चव्हाण यांनी 'टंग ड्राईव्ह सिस्टीम' या विषयावर सादर केलेल्या



पोस्टरला प्रथम पुरस्कार मिळाला मिळाला. यासाठी विभाग प्रमुख डॉ. अजित जानकर यांचे मार्गदर्शन लाभले. या परिषदेत प्रोस्थोडॉन्टीक्स विभागातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी डॉ. जयश्री घुले, डॉ. शिवानी राऊत, डॉ. नितीन काळे, डॉ. मोहिनी इरकडे, डॉ. आदीती दराडे, वैष्णवी अंबरखाने, डॉ. विद्या चन्ने यांनी सहभागी नोंदवला. या यशाबद्दल डॉ. अजित जानकर, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील, डॉ. शिरीष पवार, डॉ. शितल वाघ, डॉ. विद्या वायबसे, डॉ. योगेश नागरगोजे, डॉ. स्नेहा चोले, डॉ. ऋतुजा तिडके या यशाबद्दल डॉ. भाग्यश्री प्रविणसिंह चव्हाण हिचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. अजित जानकर, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील, डॉ. शिरीष पवार, डॉ. शितल वाघ, डॉ. विद्या वायबसे, डॉ. योगेश नागरगोजे, डॉ. स्नेहा चोले, डॉ. ऋतुजा तिडके यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.



## संपादकीय....

### विद्यार्थी कोटातील कोचिंग क्लासमध्ये प्रवेश घेतात, कारण

'सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज'ने कोटातील विद्यार्थ्यांचे विविध मुद्द्यांवर सर्वेक्षण केले. त्यातून पुढे आलेली निरीक्षणे विचारप्रवृत्त करणारी आहेत. राजस्थानातील कोटा शहरासह देशभरात अनेक ठिकाणी विद्यार्थी आत्महत्येच्या घटना गेल्या काही महिन्यांत नोंदविल्या गेल्या. कोटा शहरात वर्षभरात तब्बल २४ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. कोटासह देशभरातील प्रशिक्षण केंद्रांचे नियमन सरकारने करावे, अशी विनंती याचिकाकर्त्यांना केली होती. सर्वोच्च न्यायालयाने २० नोव्हेंबरला या याचिकेवर सुनावणी केली आणि पालकांचा दबाव हेच आत्महत्यांमागचे प्रमुख कारण असल्याचे म्हटले. मात्र कोटा येथील वास्तव काय आहे, हे जाणून घेण्यासाठी 'सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज'च्या 'लोकनीति केंद्रा'तर्फे आक्टोबर २०२३ च्या पहिल्या आठवड्यात कोटा येथे शिकणाऱ्या एक हजार विद्यार्थी/ विद्यार्थिनींचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यातून पुढे आलेले निष्कर्ष विचारप्रवृत्त करणारे आहेत. 'आपण येथेच का आलात', 'कोणत्या प्रवेश परीक्षेसाठी प्रशिक्षण घेत आहात', 'कितव्यांदा या परीक्षेला बसत आहात' इ. मुद्द्यांवर सर्वेक्षण करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, येथे येणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ३७ टक्के विद्यार्थिनी आहेत. येथील प्रवेश परीक्षेसाठी किमान १२वी पास होण्याची अट असल्यामुळे हे विद्यार्थी १५-१९ वयोगटातील आहेत. बहुतेक विद्यार्थी बिहार (३२ टक्के), उत्तर प्रदेश (२३ टक्के), राजस्थान (१८ टक्के) व मध्य प्रदेश (११ टक्के) येथून आलेले आहेत. यातील ५० टक्क्यांहून अधिक विद्यार्थी त्या त्या राज्यांतील लहान मोठ्या शहरांतून आलेले आहेत व खेड्यातील विद्यर्थ्यांची संख्या केवळ ११ टक्के आहे. बहुतेक सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांची पार्श्वभूमी मध्यमवर्गीय आहे. २७ टक्के विद्यार्थ्यांचे पालक सरकारी नोकरीत आहेत. २१ टक्के विद्यार्थ्यांच्या पालकांचा स्वत:चा व्यवसाय आहे, तर अवघे चार टक्के विद्यार्थी शेतकरी वर्गातील आहेत. कोटा येथे येण्यामागची कारणे शोधताना असे लक्षात आले की इतर कोणालातरी तिथे शिकल्याचा लाभ झाला, नात्यातील किंवा परिचयातील कोणाला तरी येथे शिकल्यामुळे प्रवेश परीक्षेत उत्तम गुण मिळाले, त्यामुळे आपल्या पाल्यालाही असेच घवघवीत यश मिळेल, असा विचार दिसतो. १३ टक्के विद्यार्थ्यांचे अगदी जवळचे नातेवाईक/ पालक कोटा येथील कोचिंग क्लासमध्ये शिकले आहेत. २८ टक्के विद्यार्थ्यांच्या दूरच्या नातेवाईकांनी कोटा येथील प्रशिक्षणाचा अनुभव घेतला आहे. त्यांच्याकडूनच त्यांना कोटाबद्दलची माहिती मिळाली आहे. ५३ टक्के विद्यार्थ्यांचे कुठलेही नातेवाईक कोटा येथे शिकलेले नाहीत. ४३ टक्के विद्यार्थ्याना कोटाबद्दलची माहिती समाजमाध्यमातून मिळालेली होती. सुमारे ४६ टक्के विद्यार्थी कोटा येथील कोचिंग क्लासेसची 'यशोगाथा' ऐकून/ वाचून आलेले होते. ३९ टक्के विद्यार्थी पालकांच्या आग्रहास्तव व १० टक्के कोटा येथे शिकणाऱ्या मित्रांमुळे येथे आले.येथे येणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी नीट या मेडिकल शिक्षणाच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ५९ टक्के आहे. त्यातही विद्यार्थिनींचे प्रमाण ७६ टक्के आहे. उर्वरित विद्यार्थी जेईई या अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेची तयारी करणारे आहेत. त्यात विद्यार्थिनींची संख्या केवळ १६ टक्के आहे. यातील सुमारे ५० टक्के विद्यार्थी प्रथमच स्पर्धा परीक्षा देणार आहेत. २६ टक्के दुसऱ्यांदा व १३ टक्के विद्यार्थी तिसऱ्यांदा परीक्षा देण्यासाठी तयारी करण्यासाठी येथे आलेले आहेत. २९ टक्के विद्यार्थी कोटा येथे येण्यापूर्वी अन्य कोणत्या तरी ठिकाणी प्रशिक्षण घेऊन आलेले आहेत. मात्र तिथे मिळणारे शिक्षण समाधानकारक नसल्याने त्यांनी कोटाचा पर्याय स्वीकारला आहे. प्रत्यक्षात परीक्षेत अपयश आल्यामुळे त्यांना वैफल्य आले असावे, असे त्यांनी दिलेल्या उत्तरांतून दिसते. कोटा येथे शिक्षण घेतल्यानंतरही प्रवेश परीक्षेत अपयशच आले, तर पुढे काय, याचे उत्तर शोधणाऱ्यांत आत्महत्या हा पर्याय समोर ठेवणाऱ्यांचे प्रमाण जास्त असावे, असे दिसते.येथील प्रवेश परीक्षेसाठी १२वी उत्तीर्ण होण्याची अट असल्यामुळे त्या त्या राज्यातील अधिकृत बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी नियमितपणे हायस्कूलचे शिक्षणही घेतलेले असणे अपेक्षित असते. परंतु सर्वेक्षणात फक्त १६ टक्के विद्यार्थी नियमितपणे हायस्कूलमध्ये गेलेले असतात, असे दिसून आले. इतर तब्बल ८१ टक्के विद्यार्थी 'डमी स्कूल'मधून दूरस्थ (डिस्टन्ट) पद्धतीने परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेले असतात.या सर्वेक्षणात अन्यही अनेक मुद्द्यांवर नोंदी करण्यात आल्या. त्यातून मिळालेल्या उत्तरांच्या आणि आकडेवारीच्या विश्लेषणातून अन्यही अनेक लक्षणीय बाबी समोर येतात. 'कोटा फॅक्टरी'चे उदात्तीकरण व त्यातील 'बिमारू' राज्यांचा सहभाग याचा विचार करता, हे सारे पैसे आणि प्रतिष्ठेभोवतीचे गणित असल्याचे दिसते. स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रशासन व्यवस्थेत 'चिकटलेल्या' अधिकाऱ्यांची लग्नाच्या बाजारातील पत वाढते. अशा अधिकारपदांमुळे त्यांना मिळणारी प्रतिष्ठा आणि पैसा हे त्यामागचे कारण असावे, असे दिसते. याचबरोबर आपली शिक्षणव्यवस्था, नोकरीच्या संधींचा तुटवडा, नोकरीतील असुरक्षितता, स्पर्धा परीक्षांना मिळालेले अवाजवी महत्त्व हीदेखील या जीवघेण्या स्पर्धेमागची कारणे आहेत.

# डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती; दरवर्षी ३०० विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी 'सारथी'चे सहाय्य

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी २०१८ मध्ये छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेची (सारथी) स्थापना करण्यात आली. 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' हे ब्रीद घेवून काम करणाऱ्या 'सारथी' संस्थेमार्फत विविध कल्याणकारी उपक्रम व योजना राबविण्याचे काम केले जात असून या योजनांच्या माहितीवर आधारित क्रमशः लेखमालेचा हा पाचवा भाग...
राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या प्रवर्गातील लक्षित गटातील विद्यार्थ्यांना देशामध्ये उच्च शिक्षणासाठी मदत व्हावी, यासाठी 'सारथी'मार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतून पात्र विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादी शुल्क देण्यात येते. डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या जातीतील असावा. तसेच त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. अर्जदार विद्यार्थ्यांने राज्य शासनाच्या किंवा इतर राज्याच्या अथवा केंद्र शासनाच्या कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा. या शिष्यवृत्तीसाठी विहीत केलेल्या देशातील २०० नामांकित विद्यापीठ अथवा शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पुर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असणे आवश्यक आहे. या २०० नामांकित विद्यापीठ आणि संस्थांची यादी 'सारथी'च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची कमाल वयोमर्यादा २५ वर्षे व पदव्युत्तर पदवी अथवा पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा ३० वर्षे इतकी आहे. दरवर्षी ३०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. यामध्ये ५० टक्के जागा मुलींसाठी राखीव आहेत. पात्र विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या लाभाचे स्वरूप विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेने आकारणी केलेले शुल्क तसेच, भोजन शुल्काची सत्रनिहाय रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते. तसेच जे विद्यार्थी वसतिगृहात न राहता अन्यत्र राहात असतील, अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची रक्कम ही तो शिक्षण घेत असलेल्या संबंधित संस्थेच्या आकारणी करण्यात ये त असलेल्या रक्कमेच्या मर्यादेत सत्रनिहाय रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा केली जाते. तसेच अभ्यासक्रमाच्या पुस्तकांसाठी २५ हजार रुपये, शैक्षणिक साहित्य आणि इतर खर्चासाठी २५ हजार रुपये अशी एकूण ५० हजार रुपये रक्कम प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात दोन टप्प्यात जमा केली जाते. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्याला इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेत येत नाही. तसेच, विद्यार्थ्याला संबंधित संस्थेत मिळणारे विद्यावेतन, फेलोशिप अन्य कोणतेही लाभ अभ्यासक्रम कालावधीत मिळत असल्यास ते वजा करुन उर्वरित शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. विद्यापीठ, संस्थांमध्ये प्रवेशित अभ्याक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक आहे. गुणानुक्रमे होते विद्यार्थ्यांची निवड

सारथी

"शाहू - विचारांना देवूया गती साधुया सर्वांगीण प्रगती"


या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील अन्य परिक्षा मंडळातून इयत्ता दहावी, बारावीची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांचे इयत्ता बारावी परीक्षेतील गुण विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या डिप्लोमाधारक विद्यार्थ्यांचे डिप्लोमाच्या परिक्षेतील गुण विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीकरीता पदवी अभ्यासक्रमातील गुणांची टक्केवारी विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. तसेच, सीजीपीए व जीपीएच्या बाबतीत संबंधित विद्यापीठाचे टक्केवारी रुपांतरण प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. ' सारथी'च्या हींींि:/ /रीींहळ-ारहरीरीहीरसीं. ळप/ या संकेतस्थळावर योजनेच्या अटी, शर्ती आणि पात्रता निकषांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

*************

– तानाजी घोलप, माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, लातूर

# सविधान के सन्मान में हम सब मैदान मे

हम सब मैदान मे.. !
बहुजन बंधु आणि भगिनींनो...
दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी छ. शिवाजी महाराज पार्क दादर मुंबई येथे होत आसलेल्या संविधान सन्मान महासभेला संबोधीत करण्यासाठी आपल्या सर्वांचे उद्धारकरते, आधुनिक भारताचे संविधान निर्माते महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातु बहुजन हृदयसम्राट संविधान के सन्मान मे वंचित बहुजन अघाडी मैदान मे..! प्रमुख मार्गदर्शक : प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर हे छत्रपती शिवाजी महाराज या क्रांतीकारी मैदानातून २६ नोव्हेंबर संविधान गौरव दिनाच्या पुर्व संध्येला देशातील तमाम वंचीत बहुजन समाजाला दिशा निर्देश देणार आहेत की, आम्ही भाताचे लोक संविधानवादी आहोत आणि हे संविधान चिरकाल पर्यंत टिकलेच पाहीजे. आपला भारत देश हा स्वातंत्र्याचे ७५ वा आमृत महोत्सव साजरा करीत आहे आणि आपल्या भारतीय संविधानाने सर्व भारतीय नागरिकांना समान हक्क आणि अधिकार दिले आहेत सर्वाना अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले आहे आणि म्हणून या संविधानामुळे सर्व नागरीक येथे गुण्या गोविंदाने बंधुभावाने रहात आहेत हे संविधान सर्वाना समता, स्वातंत्र्य, बंधुत्व बहाल करते आणि सर्वाना समान न्याय देत आसताना काही जात्यांध लोक हे संविधान संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. पण हे कदापी शक्य होणे नाही कारण की, आम्ही संविधान प्रेमी लोक जिंदे आहोत. आणि म्हणून आपल्या भारत देशाचा महान राष्ट्रीय ग्रंथ संविधान चा सन्मान सर्वांनी केलाच पाहीजे..! हे येथील प्रशासनाला ठनकाऊ सांगणे आहे आणि एक इशाराच देत आहोत की, खबरदार संविधान बदलाल तर महागात पडेल..! गौतम की जमीन युं ही विरान होने नही देंगे और भारत मे दुसरा संविधान हरगीज बनने नही देंगे और दुसरा संविधान कदापी लागु होणे नही देंगे..! काही जात्यांध लोक एतच् मशीन द्वारे या देशातील लोकतंत्र - लोकशाई संपुष्टात आनुन, हुकूमशाही आनु पहात आहेत हे कदापी शक्य होणे नाही. आज आम्ही या संविधान सन्मान महासभेतून आमचा दृड संकल्प आणि निर्धार करणार आहोत. एतच् हटाव लोकतंत्र बचाव ..!, अभी नही तो फिर कभी नही..!! मिशन २०२४ चा दृड संकल्प जयभीम का नारा गुंजेगा भारत के कोने कोने मे..!, ना लाटी ना काटी हमे तो चाहीय स्वाभिमान की रोटी, नही खायेंगे हम बैमानों की बोटी महाराष्ट्राके विधान भवन और दिल्ली के संसद भवन पर विराजमान करेंगे भिमराज का बेटा और भिमराज की बेटी..!बहुजन बंधु आणि भगिनींनो... प्रबुद्ध भारत अशोक सम्राटांच्या भारत देशात पुन्हा परिवर्तनाचे चक्र गतिमान करायचे असेल तर आपल्या भारत देशात आज घडीला फुले, शाहु, आंबेडकर, कांशीराम यांचे विचार राष्ट्रीय स्तरावर इब्झ आणि तइ- या पक्षातील दिग्गज नेते बहुजन हृदयसम्राट : प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर आणि आयरण लेडी : बहन कुमारी मायावती यांच्यात ती चमक आणि धमक आहे हे नाकारून चालणार नाही. आणि म्हणून सर्वांनी यांना साथ देणे हि काळाची गरज आहे. सर्वच पक्षात झाली गटबाजी अघाडी मे बिघाडी सबसे आगे वंचित बहुजन अघाडी आदरणीय : प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर आणि बहन कुमारी मायावती यांना भावी मुख्यमंत्री - भावी प्रधानमंत्री म्हणून आपन सारे वंचित बहुजन समाज फिल्ड वर्क करत आहोत. आणि इथून पुढे पण आपण सारे वंचित बहुजन समाज लोक आधिक जोमाने समाज जागृत करण्याचे काम करूयात. परंतू आपल्या देशात जो पर्यंत एतच् मशीन आहे तोवर आपन सत्ता स्थानी विराजमान होईल की नाही असा प्रश्न..? सर्व सामान्य वंचित बहुजन समाजाला पडतो आहे. म्हणून एतच् हटाव लोकतंत्र बचाव..! हा नारा बुलंद केलाच पाहीजे, भले ही आम्ही सारे ८५% बहुजन समाज मताधिक्याने जास्त आहोत पण एकात एक नाही बापात लेक नाही..! हि आजची वस्तु स्थिती आहे आणि त्यात एतच् द्वारे हे सत्ताधारी मंत्री - संत्री यांनी आपल्या संविधानाने प्रत्येक नागरींकांना दिलेले मताधिकार मतदानाची सत्ताधारी नेते मंडळी यांनी चोरी करून, सालो साल या देशात सत्तास्थानी आहेत व आपले अधीपते गाजवत आहेत. आणि फुले, शाहू, आबेडकरवादी नेत्यांना सत्तेपासून कोसो दुर ठेवायचेच असे त्यांचे काम चालु आहे. आंबेडकरवादी या विचारधारी नेत्यांना सत्तेपासून कोसो दुर ठेवायचे आसेल तर ते काम फक्त एतच् मशीनच करू शकते हे सत्ताधाऱ्यांना १०० % खात्री आहे आणि त्यांचा एतच् मशीनवर पुर्ण विश्वास आहे. पण या संदर्भात विरोधी पक्ष म्हणावा तसा एतच् ला विरोध करत नाहीत, क्युं की यह सबके सब मिले जुले नेता लोग है ! जब तक चलता है तब तक चलने दो हम सब मिल जुलके देश को लुटेंगे यही गांधी - मोदी की निती है ! म्हणून तर यांचा सारा मनमानी कारभार चालु आहे. अता आम्ही भारताचे लोक गप्प बसणार नाही. उठ बहुजना जागा हो एकतेचा धागा हो..! बोल बा.. भिमाचे थोडे तरी ध्यानी धरा शिका, संघटीत व्हा, आणि आधिक जोमाने संघर्ष करा..! एतच् हटवल्या शिवाय बहूजनांचा मुख्यामंत्री - प्रधानमंत्री होणे शक्य नाही. आसे माझे स्पष्ट आणि परखड मत आहे. जैसे तोते की जान पिंजरे मे होती है
वैसे ही मोदी की जान एतच् मे है.. ! हे सर्व जग जाहीर झाले आहे. माना की, मी तुमच्या ऐवढा अभ्यासू नाही पण मागील वर्षात आनेक तज्ञांनी आपल्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून पृफसह सिध्द करून दाखवले आहे की, एतच् मधे आपले वोट ट्रान्स्फर केले जाते हे १०० % खरे आहे. जपान सारखे प्रगतशील राष्ट्रात अशा मशीन बनवल्या जातात पण त्याचा ते वापर करत नाहीत. कारण की, त्यांना परिपुर्ण माहीत आहे की, एतच् मशीन धोकेबाज आहे. एकदम सहजरीत्या आपले वोट की चोरी केली जाते आणि आपन मात्र एकदम चिडीचूप आणि फक्त बघ्याची भुमीका घ्याल तर संविधानात्मक लोकतंत्र - लोकशाई धोक्यात आले आहे हे मला स्पष्ट दिसत आहे म्हणून मी माझी स्पष्ट शब्दात आपली भूमिका मांडली आहे. मी जे कांही बोलतो आहे ते आपल्या देशातील आजच्या सत्य परिस्थितीवर आपले भाष्य केले आहे. जयभीम जय संविधान ! २६ नोव्हेंबर संविधान गौरव दिनाच्या सर्व भारतीय नागरिकांना हार्दिक शुभेच्छा..!









************

**के. एच. हनवते ( निर्भिड पत्रकार )**
नवी मुंबई ९९६७७१६४४३.

# स्त्रियांनी एकजुटीने लढाई लढावी!

विश्व महिला विरुद्ध हिंसा निर्मूलन दिवस. दिनांक २५ नोव्हेंबर हा स्त्रियांच्या विरोधातील, स्त्रीसंदर्भातील हिंसा नष्ट करण्याचा आंतरराष्ट्रीय दिवस मानला जातो. हिंसेचा सामना करायला लागलेल्या स्त्रिया कित्येकदा मनाने व शरीराने कोलमडून जातात. आपले मन:स्वास्थ्य हरवून बसतात. आत्मविश्वास गमावतात. त्यांना माणूस म्हणून जगता येण्यासाठी आवश्यक परिस्थिती नसेल तर त्या कुटुंबात, समाजात त्यांचे प्रमाणही जाणीवपूर्वक कमी केले जाते. हत्या केल्या जातात. वस्तूसमान त्यांची खरेदी-विक्री होते. त्यांना मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित ठेवले जाते. घटनेने एक व्यक्ती व नागरिक म्हणून दिलेले स्वातंत्र्य त्यांच्याबाबतीत जाणूनबुजून नाकारले जाते. असा समाज इतर कितीही प्रयत्न केले तरी पुढे येऊच शकत नाही. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींचा हा प्रेरक लेख... संपादक.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या महिला विभागाच्या कार्यकारी संचालिका आवाहन करतात, स्त्रियांना त्यांच्या घरी मारहाण होते, रस्त्यांवर छेडछाडीचा सामना करावा लागतो आणि आंतरजालावरही दमदाटी व दादागिरी सहन करावी लागते. जागतिक स्तरावर ३ बायकांपैकी १ बाई आपल्या आयुष्यात कधी ना कधी शारीरिक किंवा लैंगिक हिंसा अनुभवते. काही संघर्षांमध्ये सैनिकांपेक्षाही जास्त धोका स्त्रिया व मुलींना असू शकतो. स्त्रियांच्या विरोधातील हिंसा ही खरोखर साथीच्या रोगाप्रमाणे पसरत चालली आहे व तिचा अटकाव हा व्हायलाच पाहिजे! हे अत्याचार, हिंसा यांचे स्वरूप, कारणमीमांसा, मनोवृत्ती, कायदेविषयक तरतुदी, प्रतिबंधक उपाय व जागृती यांच्या अनुषंगाने आपण आजवर वेगवेगळ्या धाग्यांच्या माध्यमांतून चर्चा व माहिती गोळा केली आहे. कौटुंबिक हिंसा, रस्त्यांवर होणारी छेडछाड, कामाच्या किंवा व्यवसायाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण अन् छेडछाड, नात्यांत होणारी छेडछाड यांबद्दल तसेच त्यांच्यावरील प्रतिबंधक उपायांबद्दल आपण वाचले, लिहिले, समजावून घेतले. नवीन पिढीने अधिकाधिक जागरूक व्हावे, स्त्रियांनी एकजुटीने ही लढाई लढावी आणि स्त्रियांसंबंधीची हिंसा समाप्त करण्याचा हा लढा स्त्री-पुरुषांनी मिळून लढावा, यासाठी अनेक संघटना व सेवाभावी संस्था प्रयत्न करत आहेत. शासकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. पण आपण त्यांबद्दल पुरेसे जागरूक आहोत का? आपली जागरूकता, दक्षता व समयोचित कार्यवाही ही स्त्रियांविरोधीची हिंसा रोखण्यासाठी फार महत्त्वाची आहे. अशा हिंसेमुळे पीडित व्यक्तींनी त्याबद्दल लज्ञा, शरम, संकोच न बाळगता, भयग्रस्त न होता तक्रार करणे व अन्याय रोखण्यास हातभार लावणे फार गरजेचे आहे. शारीरिक हिंसा मग ती एक थप्पड असो किंवा लाथेचा प्रहार असो अथवा शस्त्रांचे वार असोत, त्याविरोधात न्याय मागायचा व हिंसा रोखायचा अधिकार प्रत्येक स्त्रीस आहे.

स्त्रीविरोधातील हिंसेचा प्रतिरोध करतानाच हिंसाचाराला बळी पडलेल्या स्त्रियांना समयोचित मदत मिळावी, मार्गदर्शन व समुपदेशन मिळावे, वैद्यकीय, कायदेविषयक, सुरक्षाविषयक मदत प्राप्त व्हावी यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात योजना निर्माण होणे व त्यांची योग्य अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. हेल्पलाईन्स, न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत संस्था, सुरक्षित निवारा, कायदेविषयक सल्ला, पोलिस स्टेशनमध्ये मदत, समुपदेशन यांसारख्या गोष्टी स्त्रियांना विनाप्रयास उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच त्यात कोणताही कलंक, संकोच किंवा बदनामीची भीती नको. भेदभावाची आशंका नको. शहरांपासून ते ग्रामीण विभागांपर्यंत सर्व ठिकाणी स्त्रियांसाठी या सुविधा निर्माण होणे आवश्यक आहे. सद्या अस्तित्वात असलेल्या सुविधांच्या कैक पटीत हे काम होणे गरजेचे आहे. तसेच स्त्रियांनी व त्यांच्या कुटुंबियांनीही न घाबरता पुढे येऊन न्याय मागणे व न्याय मिळवणे या प्रक्रियेत सहकार्य करणे अनिवार्य आहे. एकीकडे स्त्री संदर्भातली हिंसा वाढत असली, तरी स्त्री शक्तीचा जागरही वाढतो आहे. ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब आहे.

आपल्याबरोबर असणारी स्त्री ही आपली आई, बायको, मुलगी, बहीण, मैत्रीण, सहकारी किंवा अजून कोणी असू शकते, तिच्याकडे या सगळ्या नात्यांच्या पलीकडे जाऊन तिला माणूस म्हणून स्वीकारले जाण्याची गरज आहे. हाच संदेश मुंबईच्या मोरया या ढोल-ताशा पथकाने आपल्या उत्कृष्ट आणि धडाकेबाज सादरीकरणातून दिला. हे सादरीकरण त्यांनी महिलांवरील हिंसाचार निर्मूलन दिनाच्या निमित्ताने मुंबईतील ब्रिटिश हाय कमिशनच्या समन्वयाने वांद्रे-कुर्ला संकुल येथे केले. वर्ल्ड बँकेच्या एका अहवालानुसार महिला सबलीकरणासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात येत असले, तरी प्रत्यक्षात महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यास अपयश येते आहे. या अहवालानुसार जगातील ३५ टक्के स्त्रिया आजही आपल्या साथीदाराच्या शारीरिक आणि लैंगिक हिंसाचाराला सामोऱ्या जात आहेत, तर ७ टक्के स्त्रिया या इतर कोणाकडून तरी होणाऱ्या शोषणाला बळी पडत आहेत. जागतिक स्तरावर ३८ टक्के स्त्रियांची हत्या ही त्यांच्याच साथीदाराकडून होत असते. या पार्श्वभूमीवर मुंबईतील ब्रिटिश डेप्युटी हाय कमिशनकडून महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी, तसेच त्यांच्या सुरक्षेविषयी जागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला असून, त्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिला सबलीकरण आणि कौटुंबिक हिंसाचाराबाबत जागृती करणे हा उद्देश असणाऱ्या धारावीतील कार्यरत असणाऱ्या स्नेहा संस्थेने छोटीशी नाटुकली सादर करून समाजाला संदेश देण्याचा प्रयत्न केला. महिलांचे सबलीकरण आणि त्यांना असलेले कायदेशीर हक्क त्यांना समजावून सांगण्याचे काम स्नेहा करत असून, त्यासाठी महिलांनाही हिमतीने पुढे येण्याचे आवाहन स्नेहामार्फत केले गेले. यानंतर, महिलांना स्वसंरक्षणाचे धडेही ब्रिटिश डेप्युटी हाय कमिशन स्टाफकडून देण्यात आले. स्त्रियांचे सबलीकरण होणे म्हणजे तिचे व्यक्तिमत्त्व एक माणूस म्हणून विकसित करायचे व कोणत्याही भेदभावाशिवाय प्रगती करण्याची संधी मिळायला हवी. महिलांचा सहभाग, त्यांना संरक्षण, त्यांची आर्थिक उन्नती, त्यांच्या क्षमतांचे संवर्धन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती होणे गरजेची आहे, यास्तवच हा लेखप्रपंच!

------------

– संकलन –
श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी. रामनगर, गडचिरोली.फक्त मोबा- ७७७५०४१०८६.

# असंघटीत वंचित राजकीय संघ शक्ती दाखवा.

असंघटीत वंचित राजकीय संघ शक्ती दाखवा.
माझा समाज भिमा–कोरेगांवीही एकत्र येतो.मोर्चे–आंदोलनालाही एकत्र येतो.चैत्यभुमीलाही एकत्र येतो.दिक्षाभुमीलाही एकत्र येतो.मग राजकारणावेळीच कसा हा विखरतो...?
वेदनादायक प्रश्न उपस्थित होतो...! म्हणूनच २५ नोव्हेंबर संविधान सन्मान महासभा छत्रपती शिवाजी महाराज मैदान दादर येथे असंघटीत वंचित राजकीय संघ शक्ती दिसणार आहे.

जगात स्वार्थापायी माणस आत्मकेंद्रित झाली आहेत.एकत्र मातृसंस्था संस्कृती नष्ट झाली आहे.एकत्र कुटुंब पद्धत विभक्त पद्धतीत झपाट्याने बदलत आहे.अन्याय,अत्याचार करून शोषणाच्या पद्धतीत सुद्धा स्मार्टचोरी मोठ्या प्रमाणत वाढली आहे.त्यामुळेच कोण कोणाचे रक्षण करण्याच्या भांडगडीत पडतांना दिसत नाही.म्हणूनच निसर्ग नियमाने माणसांनी संघटीत राहिले पाहिजे.संघटीत झाल्यावर कोणीच अन्याय अत्याचार आणि शोषण करतांना शंभर वेळा विचार करेल.आणि संघर्षात त्यांचा कधी पराभव होत नाही असे तथागत बुद्धांनी वज्री समाजाचे उदाहरणे देऊन बुद्ध आणि त्यांचा धम्मामध्ये सांगितले आहे. असंघटीत वंचित राजकीय संघ शक्ती असून ही अयशस्वी होत असते.

जगात अनेक वस्तुचा शोध लागला त्यामुळे मानव जातीचा मोठा फायदा झाला,पण त्याच बरोबर नुकसान सुध्दा झाले.ती वस्तु म्हणजेच आरसा!. आरशात प्रत्येकचे प्रतिबिंब दिसते आणि जसे आहे तसेच दिसते. मनातील विकार ही आरसात दिसतात. जगात एकमेव महामानव असे आहेत की ज्यांचा जन्म,ज्ञान प्राप्ती आणि महापरीनिर्वाण एकाची दिवशी म्हणजे वैशाख पौर्णिमेला झाले.त्यामुळे वैशाख पोर्णिमा हा दिवस जगातील १८० देशात राष्ट्रीय उत्सव म्हणून खूप वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो.वैशाख पौर्णिमेच्या दिवसी गौतमाचा जन्म लुंबिनी शक्य राज्य नेपाल येथे झाला.याच दिवशी वैशाख पोर्णिमा सात वर्ष कठोर तपचार्या करून गया बिहार येथे त्यांना ज्ञान प्राप्ती झाली. आता ती बुद्ध गया म्हणून ओळखली जाते.आणि वैशाख पोर्णिमा याच दिवशी वयाच्या ८० वर्षी त्यांचे कुशीनगर उतर प्रदेश येथे महापारीनिर्वान झाले. तथागत बुद्धांनी सांगितले होते,अंत दिप भव,स्वयं प्रकाशीत व्हा महान संदेशाचा आम्ही अर्थच समजुन घेतला नाही.कारण आम्ही विचाराशी प्रामाणिक नाही. प्रामाणिकपणा ही फार महागडी वस्तु आहे. कुठल्याही फालतू माणसाकडून त्याची अपेक्षा करू नका असे बुद्ध नेहमी सांगत होते. विचारावर विश्वास ठेउन प्रमाणिक पणे वागलात तर तुम्हाला आयुष्य हसवेल, तेव्हा समजा की हे चांगल्या कर्माचे फळ आहे. आणि जेव्हा आयुष्य रडवेल तेव्हा समजा की आता चांगले कर्म करण्याची वेळ आली आहे.
मोदी भारतात असले कि मनुवादी विचारांचे कट्टर समर्थक असतात.परदेशात गेले कि बुद्ध शिवाय दुसरे नांवच घेत नाही.बुद्धाची संघ शक्ती तिकडे गेल्यावरच आठवते.बुद्धाने सांगितलेला धम्म आणि त्यानुसार बनविलेला संघ तो पर्यत का आठवत नाही.ते म्हणतात संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा, क्यो की संघ बडा बलवान. तथागत बुद्धानी वैशाख प्रोर्णिमाला जगाला जो मानव मुक्तीचा मार्ग दाखविला त्यालाच धम्म म्हणतात.धम्म म्हणजे जीवन जगण्याचा मार्ग त्या मार्गाने जाण्यासाठी पंचशीलाचे पालन केले पाहिजे.पंचशीलेचे पालन आपण केले तर दररोजच्या जगण्यातील अनेक विकार नष्ट होतात.आणि विचार आचरणात आणले तर स्वताचा विकास व कल्याण कोणीच रोखु शकत नाही. ते समजून घेण्या करीता आदर्श आणि प्रेरणा स्रोत समजून घेतले पाहिजे. बुद्धाची शिकवण आरशा सारखी असते. ते समजून घेण्यासाठी धम्मात व धर्मात गुरु शिष्य परंमपरेला खुप महत्व आहे.एका गुरूच्या घरी एक शिष्य मनोभावे गुरुची सेवा करून शिक्षण घेत होता. त्याच्या त्या सेवेमुळे गुरु त्याच्यावर प्रसन्न होतात. शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थी घरी जाण्यासाठी निघाला तेव्हा गुरुकडे त्याने जाण्याची आज्ञा मागितली तेव्हा गुरुनी त्याला आशीर्वाद म्हणून एक आरसा भेट दिला व सांगितले की, हा दिव्य आरसा (दर्पण) असून यात मानवी मनात चालणारे विचार प्रगट होऊन दिसतात. विद्यार्थी मोठा आनंदीत झाला.हा आरसा खरेच कार्य करतो की नाही याची शहानिशा करण्यासाठी त्याने लगेच आपल्या गुरु समोर हा आरसा धरला व गुरुच्या मनात कोणते भाव आहेत, दुर्गुण आहेत हे पाहू लागला आणि गुरुच्या समोर आरसा धरताच त्याच्या चेह–यावरचा रंग पार उडाला कारण तो आरसा गुरुच्या अंतकरणात मोह,अहंकार, क्रोध आदि विकार दाखवित होता. त्याला याचे फारच दु:ख झाले की आपण ज्या गुरुची मनोभावे पूजा केली,ज्यांना पूर्ण देवाचा दर्जा दिला त्यांच्या मनात ही विकार आहेत, ते सुद्धा मानवी विकारापासून अजून सुटलेले नाहीत याचे त्याला वाईट वाटले. तो गुरुना काहीच न बोलता तो आरसा घेवून गुरुकुलातून निघाला.



रस्त्यात भेटणा–या प्रत्येकाच्या मनातील भाव पाहणे हे त्याचे कामच झाले होते. गावी परत जाताच त्याने आपल्या प्रत्येक परिचिता बरोबर हा प्रयोग करून पाहिला.त्याला प्रत्येकाच्या हृदयात कोणता ना कोणता दुर्गुण दिसून आला. शेवट त्याने आपल्या जन्मदात्या आई वडीलांच्या समोरही हा आरसा ठेवला. ते दोघेही पण त्यातून सुटले नाहीत. त्यांच्या हृदयात पण त्याला काही ना काही दुर्गुण दिसले. शेवटी या गोष्टीचा त्याला मनोमन खूप राग आला व तो परत गुरुकुलातील गुरुंकडे धावला.गुरुपाशी जाऊन मोठ्या विनम्रपणे तो म्हणाला,'' गुरुदेव, मी आपण दिलेल्या या आरशातून प्रत्येकाच्या मनात,हृदयात, अंत:करणात डोकावून पाहिले आणि मला असे जाणवले की प्रत्येकाच्याच मनात काही ना काही विकार आहेच,काही ना काही दोष आहे. एखाद्याच्या मनात कमी तर कुणाच्या मनात जास्त असे विकार, दोष भरून राहिले आहेत. हे पाहून मी फार दु:खी झालो आहे, कृपया मला मार्गदर्शन करा.गुरुनी काहीच न बोलता तो आरसा फक्त त्याच्याकडे केला आणि काय आश्चर्य त्याला त्याच्या मनाच्या प्रत्येक कोप–यात राग,द्वेष,अहंकार,क्रोध,माया आदि दुर्गुण भरून राहिलेले दिसले. गुरुजी म्हणाले,वत्सा, हा आरसा मी तुला तुझे दुर्गुण पाहून ते कमी करण्यासाठी दिला होता पण तू तर दुस–यांचे दुर्गुण पाहत बसलास आणि नको तितका वेळ खर्च केलास, अरे याच कालात जर तू जर स्वत:चे अवलोकन केले असते, तर तुला तुझ्यातील दुर्गुण सुधारता आले असते.याच काळात तु एक असामान्य व्यक्ती झाला असता.मानवाची ही कमतरता आहे,कमजोरी आहे की तो दुस–यातील दुर्गुण पाहत बसतो आणि स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्नही करत नाही. हेच या आरशातून मला तुला शिकवायचे होते. जे तुला शिकता आले नाही.लक्षात ठेवा आपण नेहमीच दुस–या व्यक्तीचे दुर्गुण बघतो, त्यावर टीका करतो पण आपल्यातील दुर्गुणांवर आपले कधीच लक्ष जात नाही.म्हणूनच बुद्धाची शिकवण आरशा सारखी असते.

भारतातील बुद्धाच्या धम्माचे ही असेच झाले बुद्धाने सांगितलेल्या धम्माचे पालन न करता ते इतरांच्या धर्मावर सतत टिका टिपणी करीत राहतात.बुद्धाच्या धम्मा बद्धल आलेला सकारात्मक विचार यांच्या आचरणातून व्यक्त होत नसल्यामुळे ते जगातील सर्व श्रेष्ठ धम्माला नकारात्मक दृष्टीने पाहतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली तथागतच्या बुद्ध धम्माची दिक्षा दिली.२२ प्रतिज्ञा दिल्या पण ते वैशाख प्रोर्णिमा किंवा बुद्धाच्या धम्माच्या प्रवचनाचा अर्थ समजु शकले नाही. आज ही ९० टक्के लोक पंचशिलेचे पालन करीत नाही. पंचशील म्हणजे काय?. हेच समजत नसेल तर अंमलात आणण्याचा प्रश्नच राहत नाही. त्यामुळेच आंबेडकरी समाजात टोकाचे विकार ठासुन भरले आहेत. त्यात कोणीच अशिक्षित किंवा सुशिक्षित माघार घेण्यास तयार नाही. म्हणुन बुद्ध धम्माच्या शिकवणीचा आरसा प्रत्येका जवळ हवा आहे.तो हरविल्या मुळे मातृसंस्था,पिपल संस्था, समता सैनिक दल,रिपाई,बहुजन,वंचित ,समिती,कृती समिती एकूण आंबेडकरी चळवळ भक्त आणि शिष्यात विखुरल्या गेल्या आहेत.नगरा नगरात हेच चित्र निर्माण झाले आहे. आज प्रत्येका कडे आरसा आहे पण तो त्यात स्वताचे प्रतिबिंब पाहत नाही. इतरा चे मात्र आवर्जुन पाहतो आणि भाष्य करतो.त्यात सत्य लिहण्याची बोलण्याची मांडण्याची हिंमत कोणी केल्यास त्यांचे परिणाम समाजात अतिशय वाईट होत आहेत.त्यामुळे कोणी बोलण्याची लिहण्याची हिंमत करीत नाही. पंचशील लागु होत नसेल तर बुद्ध आणि त्यांचा धम्मा मधील कोणते विचार आम्हाला चालतील?. बुद्धाचे विचार आणि शिकवण आरसा सारखी सोबत ठेवावी लागेल.तरच भारत बौद्धमय होईल.त्यासाठी संघ शक्ती हवी.संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा, क्यो की संघ बडा बलवान. राजकीय परिवर्तनासाठी असंघटीत वंचित राजकीय संघ शक्ती दाखवावी लागेल.

भारत ही तथागत गौतम बुद्धाची जन्मभूमी आहे.बुद्धाचा जन्म कुठे झाला?.लिबूंनी!. ज्ञानप्राप्ती कुठे झाली?.गया बुद्धगया!. महानिर्वाण कुठे झाले ?.कुशीनगर!. त्यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तिन्ही घटना वैशाख प्रोर्णिमाला भारतात घडल्या त्यामुळेच त्यांचे भारताचे जागतिक पातळीवर खुप महत्व आहे. भारतातील मनुवादी मानसिकता असणाऱ्या लोकांनी येथे तिचे वैशाख प्रोर्णिमाचे महत्व कितीही कमी करण्याचा प्रयत्न केला तरी मानवतावादी विज्ञानवादी बौद्ध धम्माचा सिद्धांतावरून तथागत बुद्ध जगातील सर्वोत्तम महापुरुष मानव प्राण्यांचे मार्ग दाते ठरले. चीन,जपान,व्हियेतनाम, थायलंड,म्यानमार,श्रीलंका, सिंगापूर,अमेरिका,कंबोडिया,मलेशिया, नेपाळ, इंडोनेशियासह जगाच्या पाठीवर १८० देशातील बौद्ध धम्म मानणारे लोक हा राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा करतात.कारण त्यांच्या मैत्रीभावना संघ शक्ती कुठून कुठून भरलेली आहे.म्हणूनच ते म्हणतात.संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा, क्यो की संघ बडा बलवान.

जगात ज्यांनी बुद्धाचा मानवतावादी विज्ञानवादी बौद्ध धम्माचा सिद्धांत समजून घेतला ते देश सर्व गोष्टीने वैभवशाली वैभवसंपन्न आहेत. बुद्धाची शिकवण आरशा सारखी असते.त्यात प्रत्येक मानवांनी आपली प्रतिमा पाहिलीच पाहिजे. तरच बुद्धाची शिकवण आपल्याला समजून घेता येईल. आम्ही कधी एकत्र येत नाही,आलो तर एकत्र टिकत नाही, आणि समजा सुदैवाने टिकलोच तर भांडण केल्याशिवाय राहत नाही.आम्ही समजून घेत नाही,समजावलेले ऐकत नाही आणि ऐकून घेतलेच तर आचरणात आणत नाहीत.आम्ही समाज म्हणून फक्त लग्नाला आणि मयतीला एकत्र येतो.तिसऱ्या ठिकाणी एकमेकांसमोर एकमेकांना चित करायला राजकीय आखाड्यात येतो.सामाजिक आशय घेवून एकत्र आलो तरी मुद्देसुद चर्चा करत नाही.विषय समजून घेत नाही.आम्ही कधीच चिकित्सा करत नाही. आम्ही प्रचंड भावनिक आहोत.म्हणुन आमचा नेहमीच धर्माच्या,झेंड्याच्या आणि जातींच्या नावावर वापर होतो.समाज निर्माणाकरिता वेळ,श्रम,बुद्धि ,कौशल्य व पैसा हे पंचदान देण्याची आमची मानसिकता नाही. आम्ही शिस्तपालन करत नाही.अनुशासन या शब्दाचा आणि आमचा तर दूरदूर पर्यन्त कडीचाहि सम्बंध नाही.बांधवांनो एकत्र येणे हे आमच्यासाठी महत्वाचे नसून एकाच दिशेने,ध्येयाने आणि विचाराने सातत्य ठेवून आता कार्यरत राहणे महत्वाचे आहे.येणारा काळ महाभयंकर आहे.म्हणून आता तरी एक व्हा.
माझा समाज भिमा–कोरेगांवीही एकत्र येतो.मोर्चे–आंदोलनालाही एकत्र येतो.चैत्यभुमीलाही एकत्र येतो.दिक्षाभुमीलाही एकत्र येतो.मग राजकारणावेळीच कसा हा विखरतो...?
वेदनादायक प्रश्न उपस्थित होतो...! म्हणूनच असंघटीत वंचित राजकीय संघ शक्ती दाखवा.सत्ताबदल घडवा.

------------------------

**सागर रामभाऊ तायडे,**
भांडूप मुंबई,९९२०४०३८५९.

# आमदार चषक राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेचे उदघाटन आ. शेखर निकम यांच्या शुभहस्ते संपन्न.





देवरुख/ प्रतिनिधी:– देवरुख हे कब्बडी स्पर्धा चे माहेर घर आहे .तसे ते कॅरम स्पर्धेचेही माहेर घर आहे. देवरुख शहरातून गुणी कॅरम पट्टू राष्ट्रीय अणि अंतर राष्ट्रीय स्पर्धा मधून खेळले आहेत ही बाब देवरुख शहरासाठी अभिमानास्पद आहे. शालेय व महाविद्यालय स्तरावर स्पर्धा प्रमाण काही कमी दिसतात बाब चिंता जनक असून शाळा व महाविद्यालय स्तरावरून गुणी खेळाडू घडत असतात. अश्या खेळाडुना पाठबळ देणे गरजेचे असते.अशा खेळाडूना आपण नक्कीच पाठबळ देऊ. असे मनोगत आ.शेखर निकम सर यांनी व्यक्त केले. स्पर्धेदरम्यान रत्नागिरी जिल्ह्यातील युवा कँरमपट्टूंचा यथोचित सत्कार आ. शेखर निकम यांच्या हस्ते करण्यात आला. चिपळूण–संगमेश्वरचे लोकप्रिय आ. शेखर निकम यांनी पुरस्कृत केलेल्या, रत्नागिरी जिल्हा कँरम असोसिएशन आयोजित व महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने आमदार चषक राज्यस्तरीय कँरम स्पर्धे चे उद्घाटन समारंभ शुक्रवारी सकाळी ११ वा. आ. शेखर निकम यांच्याहस्ते झाला. देवरूख येथे होणार आहे. ही स्पर्धा दि. २४ ते २६ नोव्हेंबर या कालावधीत देवरुख मराठा भवन येथे पार पडणार आहे. ही स्पर्धा पुरुष एकेरी व महिला एकेरी या गटात होणार आहे. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र कँरम असोसिएशनचे सचिव अरुण केदार, उपाध्यक्ष यतीन ठाकूर, संगमेश्वर तहसीलदार अमृता साबळे, गटविकास अधिकारी भरत चौगले, आयोजक रत्नागिरी जिल्हा कँरम असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप भाटकर, उपाध्यक्ष सुरेंद्र देसाई, सचिव मिलींद साप्ते, खजिनदार नितीन लिमये, जिल्हा क्रिडा अधिकारी विजय शिंदे, तालुका क्रिडा अधिकारी सचिन मांडवकर, मोहन हजारे अंतरराष्ट्रीय कॅरमपट्टू शिव छत्रपती पुरस्कार विजेता आंतरराष्ट्रीय कँरमपट्टू संदिप देवरूखकर,. रिआज अली अकबर, संगमेश्वर तालुका बँडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष मंगेश प्रभुदेसाई, स्पर्धा प्रमुख मोहन हजारे, बाबा जाधव, बाबा दामुष्टे, योगेश मोहिरे, रवि शिंदे, राहूल भस्मे, दिलीप विंचू, दामोदर साळस्कर, बाबा बेंडके, बाळू ढवळे, हनिफ हरचिरकर,सुशील भायजे,निलेश कदम, सुचअण्णा रेडीज अनिकेत सुर्वे,पंकज पुसाळकर, नितीन भोसले, पंकज पुसाळकर, प्रफुल्ल भुवड, मंगेश बांडागळे, प्रफुल्ल बाईत,राम शिंदे विकास राठोड,अमित बंडू जाधव,रामू पंदेरे, प्रदीफ कांबळे,राजू वनकुंद्रे,,रविंद्र लाड,ओमकार गायकवाड,जितेंद्र शेट्ये,दिनेश शिंदे, जयवंत पातेरे,बाळू वनकर, वसंत तावडे,प्रशांत कांबळे,प्रतिक जाधव,यांची उपस्थिती होते. तर स्पर्धेदरम्यान रत्नागिरी जिल्ह्यातील शिवछत्रपती पुरस्कार विजेते संदिप देवरुखकर व रियाज अकबर अली तसेच युवा कँरमपट्टू आकांक्षा कदम, निधी सप्रे, गुंजन खवळे, ओम पारकर, रोहन शिंदे, यश मोहिरे, द्रोण हजारे, राहुल भस्मे, अभिषेक चव्हाण यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.तरी या स्पर्धेला कँरमप्रेमींनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# पंढरपूर, घुमान ते वैष्णवदेवी सायकल यात्रेसाठी लातूर सायकलिस्टचे १२ जण रवाना



लातूर :– भागवत धर्माचे ज्येष्ठ प्रचारक संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची ७५३ वी जयंती संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा ७२७ वा संजीवन समाधी सोहळा व शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक देव यांच्या ५५४ व्या जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर ते पंजाबमधील श्रीक्षेत्र घुमानपर्यंत २१०० कि. मी. रथ व सायकल यात्रा दि. २३ नोव्हेंबर रोजी कार्तिक एकादशीच्या मुहूर्तावर निघाली आहे. या यात्रेमध्ये लातूर सायकलिस्ट क्लबचे खालील सायकलीस्ट सायकलवारी सहभागी झालेले आहेत. रवींद्र भूमकर, गंगाधर बिरादार, संजय महाजन, नागनाथ रवळे, बालाजी गायकवाड, भास्कर आरगडे, विकास बन, सर्जेराव जगताप, युवराज गिरी, प्रवीण खरवळे, योगेश जाधव, मेघराज जाधव, विवेक होळसंबरे या सायकलिस्टचा सहभाग आहे.महाराष्ट्रभरातून सुमारे १०० सायकलिस्ट यात सहभागी झाले आहेत. संत शिरोमणी नामदेव महाराज यांनी भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला. याच सात्विक विचाराला तेवत ठेवण्यासाठी या रथ व सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हा रथ व सायकल यात्रा ही महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणा व पंजाब आदी या राज्यातून मार्गस्थ होणार आहे. यात्रेचा समारोप संत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी दिन म्हणजेच दि. ११ डिसेंबर रोजी पंजाब येथभल श्रीक्षेत्र घुमान येथे संपन्न होणार आहे. यानंतर लातूर सायकलिस्ट क्लबचे सदस्य हे घुमान ते वैष्णोदेवी अशी सायकल वारी करून आपली सायकल यात्रा समाप्त करणार आहेत. लातूर सायकलिस्ट क्लबच्या या बारा वीर सायकलिस्टनी पहाटे गंजगोलाई येथून आई जगदंबेचे दर्शन घेऊन नंतर रेणापूर येथे रेणुकामातेचे दर्शन घेऊन यात्रेस प्रारंभ केला. या सायकल वारीस प्रोत्साहन देण्यासाठी लातूर सायकलिस्ट क्लबचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देवणी बाजार समितीस राज्य उपसभापती संतोष सोमवंशी यांची सदिच्छा भेट



लातूर : कृषी उत्पन्न बाजार समिती देवणी येथील मासिक बैठकीस महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी सदिच्छा भेट घेऊन मार्केट यार्डाच्या उन्नती साठी सखोल असे मार्गदर्शन केले.

देवणी कृषी उत्पन्न बाजार समितीला आता चांगले दिवस येत असून येथे शेतकऱ्यांसह खरेदीदारानेही आपली एंट्री मारली आहे. येथे लातूर, उदगीर सारख्या मार्केट यार्डा पेक्षा पन्नास ते शंभर रूपये जादा दराने शेतीमालाची खरेदी विक्री होत आहे. परिणामी देवणी कृषी उत्पन्न बाजार समीतीचा बोलबाला वाढत आहे. व तालुक्यासह सिमावर्ती भागातील शेतकरी आपला शेतीमाल देवणी मार्केट येथे आणण्याचा ओढा वाढला असून येथे खरेदीदारही वाढत आहेत.

याचे योग्य नियोजन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी सदिच्छा भेट घेऊन संचालक मंडळास मार्गदर्शन केले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती देवणी च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सभापती सदाशिव रामचंद्रराव पाटील तळेगावकर, उपसभापती दिलीप मजगे, संचालक विलास कदम, संगप्पा चरपले, बसवराज पाटील, मोहनराव बालूरे बालाजी बिरादार, राजकुमार बिरादार भोसले सुकुमारबाई नामदेवराव, कमलबाई नागनाथ रामासने, शिवाजी पडीले, श्रीधर पाटील, सोपान शिरसे, उमाकांत बर्गे, संदीपान पेठे, शिवानंद मिर्झापुरे, मनोज लांडगे, अमीर शेख, व अटल धनूरे आदीसह व्यापारी मल्लिकार्जुन डोंगरे, राजकुमार मुर्गे, आदी उपस्थित होते.

# बँकातून नोकर भरती करा या मागणीसाठी 'एआयबीईए 'चे दीर्घ आंदोलन - कॉ. धनंजय कुलकर्णी यांची पत्रकार परिषदेत माहिती

लातूर ( प्रतिनिधी) :- गेल्या काही वर्षापासून केंद्र शासनाच्या मालकीच्या असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया सह बारा राष्ट्रीयकृत बँकातून शिपाई, क्लार्क व सफाई कर्मचारी या तिन्ही संवर्गातील नोकर भरती टप्प्याटप्प्याने कमी कमी करत जवळपास नगण्य करण्यात आलेली आहे. या नोकरभरती वरील अघोषित बंदीच्या विरोधात इंडिया बँक एम्प्लॉयमेंट असोसिएशन च्या वतीने संपाचे हत्यार उपसण्यात आले असून दीर्घ आंदोलन छेडण्यात येणार आहे ,अशी माहिती महाराष्ट्र स्टेट बँक एम्लॉईज फेडरेशनचे समन्वयक कॉ.धनंजय कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना दिली

४ डिसेंबर पासून वेगवेगळ्या टप्प्यावर बँक कर्मचारी संपावर जाणार आहेत .यामध्ये पंजाब नॅशनल बँक आणि स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेतील कर्मचारी ४ डिसेंबर रोजी संपावर जाणार आहेत. बँक ऑफ बडोदा आणि बँक ऑफ इंडिया मधील कर्मचारी ५ डिसेंबर रोजी संपावर जाणार आहेत. ऑल इंडिया स्ट्राइक मध्ये कॅनरा बँक आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया मधील कर्मचारी ६ डिसेंबर रोजी संपावर जाणार आहेत .तसेच इंडियन बँक अँड यु सी ओ बँक मधील कर्मचारी ७ डिसेंबर रोजी , युनियन बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र मधील कर्मचारी ८ डिसेंबर रोजी आणि ११ डिसेंबर रोजी सगळ्या खाजगी बँकेतील कर्मचारी संपावर जाणार आहेत.

२ जानेवारी २०२४ रोजी तामिळनाडू ,केरला ,आंध्र प्रदेश ,तेलंगणा ,कर्नाटक ,पांडिचेरी ,अंदमान अँड निकोबार व लक्षदीप येथील कर्मचारी संपावर जाणार आहेत. ३ जानेवारी रोजी गुजरात ,महाराष्ट्र, गोवा, दादर दमन आणि दिव येथील कर्मचारी संपावर जातील. ४ जानेवारी रोजी राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि चंदीगड येथील कर्मचारी संपावर जाणार आहेत. ५ जानेवारी रोजी दिल्ली, पंजाब, हरियाणा ,जम्मू अँड काश्मीर, लडाख ,उत्तराखंड ,हिमाचल प्रदेश येथील बँकातील कर्मचारी संपावर जातील. ६ जानेवारी रोजी वेस्ट बेंगॉल ,ओडिसा ,बिहार ,झारखंड, आसाम, त्रिपुरा, मेघालय, मणिपूर ,अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम येथील कर्मचारी संपावर जातील, अशी माहिती धनंजय कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना दिली.

पुढे बोलताना ते म्हणाले की, ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन या बँकिंग क्षेत्रातील सर्वात मोठ्या आणि सर्व सरकारी बँकात बहुमतात असलेल्या संघटनेच्या गुहाटी आसाम येथे सप्टेंबर २०२३ दरम्यान संपन्न झालेल्या कार्यकारणी सभेत संमत झालेल्या ठरावानुसार संघटनेने सरकारी राष्ट्रीयकृत बँकातील नोकर भरती या प्रश्नावर प्रदीर्घ आंदोलनाची घोषणा केलेली आहे. ही नोकर भरती लिपिक ( क्लार्क ) शिपाई व अंशकालीन सफाई कर्मचारी या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील आहे. गेल्या काही वर्षापासून केंद्र शासनाच्या मालकीच्या असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया सह बारा राष्ट्रीयकृत बँकातून क्लार्क, शिपाई व सफाई कर्मचारी या तीनही संवर्गातील नोकर भरती टप्प्याटप्प्याने कमी कमी करून जवळपास नगण्य करण्यात आलेली आहे. नोकर भरतीवरील या अघोषित बंदीमुळे एकीकडे अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यावर कामाचा बोजाही वाढला असून, त्यांच्या शारीरिक मानसिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊन त्यांचे' वर्क लाइफ बॅलन्स' (कामकाज आणि कौटुंबिक सामाजिक आयुष्य यातील संतुलन) संबंधीचे प्रश्न निर्माण होत आहेत दुसरीकडे केंद्र सरकार आपली प्रत्येक योजना सरकारी बँका मार्फत राबवत असल्याने सामान्य माणसाचा बँकेचे संबंध जोडला गेलेला आहे. या प्रचंड प्रमाणात वाढलेल्या ग्राहक संखेला समाधानकारक सेवा देणे अपुऱ्या कर्मचाऱ्यांना अशक्य होत आहे. ग्राहक सेवा व वित्तीय समावेशकही दोन्ही उद्दिष्टे पूर्ण होण्यास अडचणी येत आहेत.



बँकांच्या सेवा आणि व्यवहार यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा (डिजिटलायझेशन ) वापर होत आहे यामुळे व्यवसाय वाढला आहे. ग्राहक संख्या वाढली म्हणून कर्मचाऱ्यांची पूर्वीसारखी आवश्यकता नाही हा व्यवस्थापन ,सरकारचा दावा असत्य आणि दिशाभूल करणारा आहे .कारण एकीकडे आजही सर्वसामान्य बँक ग्राहक बँकांच्या शाखेत येऊन व्यवहार करण्यास प्राधान्य देणारा आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मवर होणारे फ्रॉड आणि आवश्यक तंत्रज्ञान या आर्थिक साक्षरतेचा अभाव असल्यामुळे बँकेच्या काउंटरवर असणारी गर्दी कायम आहे. शिपाई ,सफाई कर्मचारी यासंवर्गातील नोकर भरती तर पूर्णतः थांबलेली आहे व या कर्मचाऱ्यांनी करावयाची कामे कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करून केली जात आहे .हे लोन आता लिपिक क्लार्क संदर्भातील लागू होत आहेत. लिपिक वर्गाचे करावयाची असंख्य कामे आउट सोर्स केली जात आहेत .त्यामुळे फॉडसचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच ग्राहकांच्या हितास बाधा येत आहे. विविध संवर्गातील नोकर भरती जवळपास थांबल्यामुळे आजमितीस १२ सरकारी बँकातून दोन लाख रिक्त जागा असताना केवळ सात ते आठ हजार लिपिकांची भरती केली जात आहे. शिपाई व सफाई कर्मचाऱ्यांची पदे संपुष्टात आणली गेली आहेत .त्याच्या परिणामी पदवीधर तरुण-तरुणीसाठी उपलब्ध असलेल्या बँकेतील नोकरीच्या संधी संपुष्टात आलेल्या आहेत आणि आज मितिला १०.४०% इतक्या भयावह प्रमाणात बेरोजगारीचे प्रमाण असलेले देशात ही अतिशय गंभीर बाब समजली पाहिजे ,अशी अशी टीकाही कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी या पत्रकार परिषदेत बोलताना केली.

# आटोळाच्या सरपंच-ग्रामसेवकाने संगनमताने बनावट फेरफार करुन दिला प्लॉटचा नमुना नंबर ८

## शिवा संघटनेची सीईओ, एसपी,बीडीओंकडे तक्रार,आठ दिवसात कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन

लातूर :- चाकूर तालुक्यातील आटोळा येथील सरपंच आणि ग्रामसेवकांनी अधिकाराचा गैरवापर करत गावातील एका जमीनीच्या खरेदी खतावरुन नियमबाह्य ठराव करुन,ग्रामपंचायत कार्यालयात प्लॉट म्हणून नमुना नंबर ८ बहाल केल्याचा आरोप करत,त्या दोघांना निलंबीत करुन,आठ दिवसात फसवूणकीचा गुन्हा दाखल करावा अन्यथा आपल्या कार्यालयांपुढे गावकर्यांसह तीव्र आंदोलन करण्यात येईल,अशा इशारा गर्भित शिवा अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक संघटनेचे राज्य सदस्य दत्ताभाऊ खंकरे आदिंनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,पोलीस अधीक्षक व चाकूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना २२ नोव्हेंबर २०२३ रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे. सदर निवेदनात म्हटले आहे की, आटोळा,ता. चाकूर येथील कलप्पा मल्लिकार्जून मिटकरी यांनी गट नं.१६७ मधील २ आर जमिनीत विहीर पाडण्यासाठी शिवदास बसवंत मोतीपवळे यांना अंतेश्वर कल्लाप्पा तोडकरी यांची वाटणीस आलेल्या जमिनीची चुकीची चतु:र्सिमा दाखवून खरेदीखत करुन दिले. कलप्पा तोडकरी यांनी शिवदास मोतीपवळे यांना २ आर दिलेल्या जमिनीसह ५२ आर जमीन जशास तसे दुबार खरेदीखत करुन आपल्या पत्नीच्या नावे करुन दिले. याबाबत कलप्पा तोडकरी यांनी एकच जमीन दोनदा खरेदी खत करुन दिल्याची तक्रार अंतेश्वर तोडकरी यांनी आटोळाचे सरपंच व ग्रामसेवकांना दिली होती.तरीही सरपंच आणि ग्रामसेवकांनी संगनमताने ७/१२ वर फेर न होता केवळ जमीन रजिस्ट्रीमध्ये खोट्या चतु: र्सिमा अंतेश्वर तोडकरी यांच्या जमिनीच्या दाखवून खोटा ठराव करुन नमुना नं.८ अ दिले.हावगीराव तोडकरी व रेणुका तोडकरी यांना कोणत्याच कागदोपत्री पुराव्याशिवाय दिलेल्या नमुना नंबर ८ मधील ग्रामपंचायत मिळकत नं.४३२ व ७८२ च्या मालकीचा नमुना ८ अ तात्काळ रद्द करावा. आटोळा येथील नमुना नंबर ८ अ चे व फेरफार नक्कल रजिस्टर माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली होती पण ग्रामसेवकांनी लेखी



स्वरुपात फेर नक्कल रजिस्टर आमच्याकडे उपलब्ध नाही,अशी उडवाउडवीची उत्तरे दिली. कलप्पा तोडकरी,विमलाबाई कलप्पा तोडकरी,शिवदास मोतीपवळे तसेच सरपंच,ग्रामसेवक यांनी संगनमताने अंतेश्वर तोडकरी यांच्या जमिनीची खोटी चतु:र्सिमा दाखवून शिवदास मोतीपवळे यांची खोटी नोंद घेतलेल्या नमुना नंबर ८ अ तात्काळ रद्द करावा,पदाचा गैरवापर करणारे सरपंच व ग्रामसेवकांना पदावरुन निलंबीत करुन त्यांच्यावर फसवूणकीचा गुन्हा दाखल करावा,आणि अंतेश्वर तोडकरी यांना आठ दिवसात न्याय द्यावा, आपल्या कार्यालयासमोर शिवा संघटनेच्यातीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, अशा इशारा राज्य सदस्य दत्ताभाऊ खंकरे तसेच विलास खिंडे, अंतेश्वर तोडकरी,राजेंद्र पांडे व दशरथ पांडे,किरण आप्पा खोबरे जगन्नाथ कोळंबे शिवहार वाडकर मनोज हंसनाळे श्रीकांत काळे उमाकांत पाटील दादा पांडे,यांनी सदर निवेदनात दिला आहे.

# गद्दारांना हिंदुहृदयसम्राट म्हणण्याची नवी परंपरा : संजय राऊत

मुंबई : बेइमान्यांना हिंदुहृदयसम्राट म्हणण्याची परंपरा महाराष्ट्राच्या बाहेर सुरू झालेली दिसते आहे. कारण महाराष्ट्रात असे काही केले तर लोक जोड्याने मारतील असे म्हणत एकनाथ शिंदेंच्या पोस्टरवरून संजय राऊत यांनी त्यांच्यावर टीका केली आहे. राजस्थानात एकनाथ शिंदे यांच्या प्रचाराचे पोस्टर होते. त्यावर एकनाथ शिंदे यांचा उल्लेख हिंदुहृदयसम्राट असा करण्यात आला होता.



यावरूनच संजय राऊत आक्रमक झाले आहेत.हिंदुहृदयसम्राट आहोत की नाही हे एकनाथ शिंदे यांनी स्वत:च सांगितले पाहिजे. कारण त्यांचा पक्ष म्हणजे जो काही गट त्यांनी स्थापन केला आहे तो गट आणि अजित पवार गट हे भविष्यात भाजपात विलीन होणार आहेत.कमळ चिन्हावर निवडणुका लढवतील. त्यांनी स्वत:ला कितीही पदव्या बाहेर लावल्या तरीही महाराष्ट्रात अशा पदव्या लावायची त्यांची हिंमत नाही. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ येथे अशा पदव्या लावत आहेत. उद्या अमेरिकेत जो बायडेन यांच्या प्रचाराला गेले तर तिथेही असेच करतील, असा टोला राऊत यांनी लगावला.

# 'विकसित भारत संकल्प यात्रा' पोहचली लातूर जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते झाले उदघाटन

लातूर :- शासनाच्या विविध विभागांच्या प्रमुख योजना समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहचाव्यात तसेच या योजनेपासून वंचीत राहिलेल्या पर्यंत हा लाभ पोहचावा यासाठी 'विकसित भारत संकल्प यात्रा' ही विशेष मोहीम २४ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत लातूर जिल्ह्यात राबविली जाईल.यासाठी शासनाच्या सर्व यंत्रणा यासाठी सहकार्य करणार आहे. ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषद आणि शहरी भागासाठी नगर विकास विभाग समन्वयक म्हणून काम करणार आहेत. ह्या योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी ग्रामपंचायत पासून ते महानगरपालिकेपर्यंत सर्व नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी केले.

या यात्रेच्या रथांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून या ' विकसित भारत संकल्प यात्रेला सुरुवात करण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी नगर विकास विभागाचे सहआयुक्त रामदास कोकरे,जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ,नियोजन विभागाचे सहायक नियोजन अधिकारी शंकर साबरे, वामन जाधव,माहिती आणि प्रसारण विभागाचे अधिकारी अंबादास यादव उपस्थित होते.

या मोहिमेच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या विविध योजनेंतर्गत पात्र असलेल्या, परंतु अद्यापपर्यंत प्रत्यक्ष लाभ न मिळालेल्या लोकांपर्यंत या योजना पोहचविणे, या योजनाच्या माहितीचा प्रसार आणि योजनाबद्दल जागृती निर्माण करणे, या योजनांच्या अंमलबजावणीबाबत नागरिकांशी संवाद साधून त्यांचे अनुभव व सूचना जाणून घेणे हे या 'विकसित भारत संकल्प यात्रे'चा मुळ उद्देश आहे. 'विकसित भारत संकल्प यात्रे'साठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असून ही समितीचे सहअध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी आहेत. तर निवासी उपजिल्हाधिकारी हे सदस्य सचिव असणार आहेत. या समिती मध्ये महानगरपालिका आयुक्त, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत ), सर्व मुख्याधिकारी नगर परिषद, नगर पंचायत, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, आरोग्य उपसंचालक, जिल्हा क्रीडा अधिकारी इत्यादी अधिकारी सदस्य आहेत. यात्रा कुठे कुठे





जाणार आहे याचे ग्रामीण भागाचे नियोजन जिल्हा परिषदेने केले असून शहराचे नियोजन नगर विकास विभागाने केले आहे.

ड्रोन फवारणीचे झाले प्रात्यक्षिक

राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्स यांच्या टीम कडून गावागावात मोठ्या ड्रोन द्वारे फवारणी करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले जाणार असून या ड्रोनला वीस लिटर एवढ्या क्षमतेची टाकी बसविण्यात आली असून या द्वारे अत्यंत कमी वेळात आणि कमी रसायनात फवारणी होते. जिल्हाधिकारी यांच्या समोर हे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. त्या वेळी जिल्हाधिकारी यांनी या ड्रोनची सर्व माहिती विचारून घेतली.

# कनकधारा चॅरीटेबलं ट्रस्टच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमात आगळीवेगळी दिवाळी साजरी

लातूर :- कनकधारा चॅरीटेबलं ट्रस्टच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमात आगळीवेगळी दिवाळी साजरी कनकधारा चॅरिटेबल ट्रस्टच्या लातूर अध्यक्ष सौ. प्रिती प्रशांत सोनकर व उपाध्यक्ष डॉ .प्रांजली अडसूळ यांच्या पुढाकाराने तसेच उदगीर शहरातील प्रसिद्ध व्यापारी राजेश अशोकराव बेद्रे, बालाजी डोईजोडे यांच्या सहकार्याने लातूर येथील मातोश्री वृद्धाश्रमात एक आगळी वेगळी दिवाळी साजरी करण्यात आली.त्यात मातोश्री वृद्धाश्रमातील महिलांना साड्या व सर्वांसाठी दिवाळी फराळ वाटप तसेच उटणं, कंगवा, बॉडी लोशन, झंडू बाम, सुगंधी तेल असे एक दिवाळी उपयुक्त किट बनवून वाटप करण्यात आले



त्या वेळी लातूर चे प्रसिद्ध व्यापारी श्री. प्रवीणजी ब्रिजवासी, श्री. लक्ष्मीकांतजी माळवदकर, पोलीस डिपार्टमेंट चे श्री उदय पाठक साहेब,सौ सुषमा उदय पाठक व कनकधारा चॅरीटेबल ट्रस्ट चे सचिव श्री. प्रगीत तांदळे उपस्थित होते. मातोश्री वृद्धाश्रमातील सर्व आजी आजोबांसाठी काही ना काही करण्याची कायम इच्छा असते आणि दिवाळी सणाचे औचित्य साधून कनकधारा चॅरीटेबल ट्रस्ट च्या वतीने दरवर्षी अशा प्रकारच्या कार्यक्रमाने ती इच्छा पूर्ण होते आणि सर्व आजी आजोबांचे भरभरून प्रेम आणि आशीर्वाद आम्हास लाभतात ज्याने आमचा आनंद द्विगुणीत होतो असे कनकधारा चॅरीटेबलं ट्रस्ट च्या अध्यक्ष सौ.प्रिती प्रशांत सोनकर व उपाध्यक्ष डॉ. प्रांजली अडसूळ असे मनोगत होते.

# जैवतंत्रज्ञान विभागाचे उपक्रम इतर विभागांसाठी आदर्श - डॉ.गुळवे

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२४ नोव्हेंबर २०२३ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक ' एडविन कॉन्क्लिन ' यांची १६० वी जयंती साजती करण्यात आली.वैज्ञानिकांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्यास अभिवादन करण्याचा हा उपक्रम दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातर्फे राबवला जातो.याच निमित्ताने विद्यार्थ्यांना संशोधकांबद्दल अधिक माहिती मिळेल असे उद्दिष्ट समोर ठेवून हा उपक्रम सुरू केला आहे. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.आशिष गुळवे,प्रा.आर.एस.शिंदे,प्रा.आर.बी. डिग्रसकर व जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.कार्यक्रमाची प्रस्तावना बी.एस्सी. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी पर्णवी ढवारे यांनी केली.एडविन कॉन्क्लिन यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी.प्रथम वर्षाची विद्यार्थीनी समृद्धी जगदाळे यांनी थोडक्यात प्रकाशझोतात आणली. याप्रसंगी डॉ.आशिष गुळवे यांनी जैवतंत्रज्ञान विभागाच्या स्तुत्य उपक्रमास शुभेच्छा दिल्या.इतरही विभागांनी आदर्श घ्यावा असा हा उपक्रम आहे.विद्यार्थांना वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्ताने विविध वैज्ञानिकांच्या योगदानाविषयी माहिती मिळवून देणारा प्रेरणादायी उपक्रम असून इतर महाविद्यालयांनीही अशा प्रकारच्या उपक्रमांतून वैज्ञानिकांबद्दल मुलांमध्ये जागरूकता निर्माण करावी,असे ते म्हणाले. एडविन ग्रँट हे एक अमेरिकन जीवशास्त्रज्ञ होते.जे त्यांच्या मानवी उत्क्रांतीच्या अभ्यासासाठी प्रसिद्ध होते,जे प्रगत



तंत्रज्ञानाला समाजाच्या प्रतिसादाचे प्रमुख समीक्षक होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.के.एस.गोमारे,प्रा.डॉ.फिरदोस बिरादार,प्रा.अवंती बिडकर,प्रा.श्वेता मदने,प्रा.मयुरी जाधव,प्रा.श्रीनिवास कुलकर्णी,प्रा.स्वरुप गावकरे व प्रा.अनुराधा शिंदे पाटील,बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान विभागाचे विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी विशाल टर्फे,श्रावण माळी,लक्ष्मण शिंदे यांची उपस्थिती होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE